SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

# लक्ष्मी पूजन साहीत्य कृती

हळदीकुंकू, अक्षता, फुले, बेल, दुर्वा, तुळशी, गुलाब (दोन) लाल कमळ (दोन), गजरे (दोन), वेणी (दोन), हार एक, गुळ, खोबरे, पंचामृत (दूध, दही, तूप, मध, साखर) नारळ 2 फळे-5, विड्याची पाने 10, सुपाऱ्या 5, लाह्या, बत्तासे अगरबत्ती, कापूर, गंध, अत्तर जाणवी जोड-१, कापसाचे वस्त्र 1,पिवळा व लाल ब्लाऊज पीस

(प्रत्येकी 1), फराळाचा नेवैद्य.

# पूजेसाठी वापरण्यात येणारी भांडी


ताम्हण-२, एक पळी भांडे, दोननिरांजन, समई, तांबे २, पाट, चौरंग पुजेच्या साहित्यासाठी दोन ताटे

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
7304904149

## पुजेची मांडणी:-

प्रथम एक चौरंग घ्यावा. त्याच्या मध्यभागी तांदळाची रास करावी त्याच्यावर पाणी भरलेला एक कलश ठेवावा. त्यामध्ये एक सुपारी, एक रुपयाचे नाणे, गंध, अक्षता, फुल, हळदी कुंकू, दूर्वा घालाव्यात. एक आंब्याचा डहाळा कलशामध्ये घालावा त्याच्यावर एक ताम्हण ठेवावे. त्यामध्ये पुढील गोष्टीमधील एक गोष्ट ठेवावी (तांदूळ, गहू, साखर , चण्याची डाळ) यापैकी कोणत्याही एका धान्याने ताम्हण पूर्ण भरून त्यावर एक नवीन वस्त्र घालावे, त्यावर हळदीकुंकवाने स्वस्तीक काढावे .एक मध्यभागी सुपारी ठेवावी. वरुण देवता म्हणून त्यांची पुजा करावी. व त्यातच लक्ष्मीची मूर्ती, लक्ष्मीचे नाणे, किंवा सुपारी, नारळ यापैकी कोणतेही एक लक्ष्मीचे प्रतीक म्हणून मध्यभागी स्थापन करावे व लक्ष्मीपूजन करावे.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्‌गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
7304904149



SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

सूचना-१)मध्यभागी तांदळाची रास त्यावर पाण्याने भरलेला एक कलश. त्यामध्ये- आंब्याची डहाळी, एक सुपारी, गंध, अक्षता, फुल, दुर्वा, हळद-कुंकू त्यावर एक ताम्हण त्यावर कोणतेही एक धान्य उदा. (गहू, तांदूळ, साखर, चण्याची डाळ हरभरे, मुगाची डाळ) त्यावर एक नवीन रुमाल वस्त्र, मध्यभागी महालक्ष्मी, असल्यास कुबेराची मूर्ती ठेवणे व त्यावर सर्व पूजा विधी करणे.

२) पानांचे विंडे - (2 पाने, एक सुपारी, एक नाणे.असे पाच विडे)

३) दिवा - तुपाचा किंवा तेलाचा (कोणताही)

४)एक मुठ तांदूळ घालून त्यांच्यावर एक गणयली मूर्ती ठेवून प्रथम त्यांची पूजा करणे. गुळ खोबरे जवळ ठेवावे-

५)एक नारळ, पाच फळे, (कोणतीही) सुका मेवा (इच्छित)

६) नैवेदय :- दिपावली फराळ, नैवेदय - खीर, शीरा, मिठाई, जेवण.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

## लक्ष्मीपूजन माहीती पूजा करण्याचे मंत्र कृती सहीत:

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने देवी लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे.(लक्ष्मीपूजन साजरा करण्याची पद्धत)प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.लक्ष्मीपूजन करतांना एका चौरंगावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. काही ठिकाणी कलशावर ताम्हण ठेवून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. लक्ष्मीजवळच कलशावर कुबेराची प्रतिमा ठेवतात. त्यानंतर लक्ष्मी आदी देवतांना लवंग, वेलची आणि

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. मग हातातील चुडीने पितृमार्गदर्शन करतात. ब्राह्मणांना आणि अन्य क्षुधापीडितांना भोजन घालतात. रात्री जागरण करतात. आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जेथे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त आणि क्षमाशील पुरुष आणि गुणवती आणि पतीव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

## लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे महत्त्व

सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; पण त्याला अपवाद या अमावास्येचा आहे. हा दिवस शुभ मानला आहे; पण तो सर्व कामांना नाही; म्हणून या दिवसाला शुभ म्हणण्यापेक्षा आनंदी दिवस म्हणणे योग्य !श्री लक्ष्मी देवीला करावयची प्रार्थनाजमा-खर्चाच्या हिशोबाची वही

लक्ष्मीसमोर ठेवायची आणि प्रार्थना करायची, 'हे लक्ष्मी, तुझ्या आशीर्वादाने मिळालेल्या धनाचा उपयोग आम्ही सत्कार्यासाठी आणि ईश्वरी कार्य म्हणून केला आहे. त्याचा ताळमेळ करून तुझ्यासमोर ठेवला आहे. त्याला तुझी संमती

असू दे. तुझ्यापासून मी काही लपवून ठेवू शकत नाही. जर मी तुझा विनियोग योग्य प्रकारे केला नाही, तर तू माझ्या जवळून निघून जाशील, याची मी सतत जाणीव ठेवतो. तेव्हा हे लक्ष्मी देवी, माझ्या खर्चाला संमती देण्यासाठी भगवंताजवळ तू माझी शिफारस कर; कारण तुझ्या शिफारशीशिवाय तो त्याला मान्यता देणार नाही. पुढील वर्षीही आमचे कार्य सुरळीत पार पडू दे.माझे भरणपोषण करण्यासाठी मला चैतन्य देणारा, माझ्या प्रत्येक कार्यात सहभागी असलेला भगवंत माझ्यात राहून कार्य करतो. तेव्हा तोही भागीदार आहे. मी वर्षभरात काय मिळविले आणि त्याचा विनियोग कसा केला, त्याच्या पै पै चा

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

हिशोब या जमा-खर्चाच्या वहीत नमूद केला आहे. तो आज तपासणीसाठी तुझ्यासमोर ठेवला आहे. तू साक्षी आहेस. तू माझ्याजवळ आल्यापासून मी तुझा मानच राखला आहे. तुझा विनियोग प्रभूकार्यासाठीच केला आहे; कारण त्यात प्रभूचाही वाटा आहे. हे लक्ष्मीदेवी, तू निष्कलंक आणि स्वच्छ अशी आहेस, त्यामुळे मी तुझा उपयोग वाईट कामात कधीही केला नाही.हे सर्व मला श्री सरस्वतीदेवीने केलेल्या साहाय्यामुळेच शक्य झाले. तिने माझा विवेक कधीही ढळू दिला नाही. त्यामुळेच माझे आत्मबल कमी झाले नाही. मला आणि माझ्या कुटुंबाला सुख आणि समाधान लाभले. हा खर्च मी प्रभूचे स्मरण ठेवूनच केला. (स्मरणाद्वारे) त्याला सहभागी करून घेतले असल्यामुळेच त्याचेही सहकार्य लाभले आहे. माझ्या नजरेस काही चूक आल्यास मी ती पुढे होऊ देणार नाही. तेव्हा हे लक्ष्मीदेवी आणि सरस्वतीदेवी, तुम्ही माझ्यावर कृपा करा

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABBCS9450B
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

आणि माझ्या हातून जन्मभर हितकारक असाच विनियोग होऊ द्या.'आध्यात्मिक महत्त्व : अशाप्रकारे लक्ष्मीदेवी आणि सरस्वतीदेवी यांना प्रार्थना केल्यामुळे जिवामध्ये असणारी कर्तेपणाची सूक्ष्म जाणीव न्यून होऊन त्याची वृत्ती अंतर्मुख होते. त्यामुळे धनामुळे निर्माण होणारा उन्माद त्याच्यात निर्माण न होता त्याच्या वागण्यात विनयशीलता येते. (लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री केर का काढतात ?)

मध्यरात्री नवीन केरसुणीने घरातील केर सुपात भरून तो बाहेर टाकावा' , असे सांगितले आहे. याला 'अलक्ष्मी (कचरा, दारिद्र्य) निःसारण' म्हणतात. एरव्ही कधीही रात्री घर झाडणे वा केर टाकणे करायचे नसते. फक्त या रात्री ते करायचे असते. कचरा काढतांना सुपे आणि दिमडी वाजवूनही अलक्ष्मीला हाकलून लावतात.गुण निर्माण केले तरीही दोष नाहीसे झाले तरच गुणांना महत्त्व येते. येथे लक्ष्मीप्राप्तीचा उपाय झाला, तसेच अलक्ष्मीचा नाशही झाला पाहिजे; म्हणून या दिवशी नवीन केरसुणी विकत घेतात. तिला 'लक्ष्मी

म्हणतात.लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणण्याचे कारणएखाद्या देवतेची उपासना केली की, त्या देवतेचे तत्त्व उपासकाकडे येते आणि त्यानुसार लक्षणे दिसतात, उदा.श्री लक्ष्मीची उपासना केली की, धनप्राप्ती होते. उपासना कमी झाली, अहं जागृत झाला की, देवतेचे तत्त्व उपासकाला सोडून जाते. अशाच कारणांमुळे श्री लक्ष्मी उपासकाला सोडून जाते. तेव्हा स्वतःची चूक मान्य न करता व्यक्ती म्हणते, लक्ष्मी चंचल आहे. येथे लक्षात घेण्यासारखे सूत्र हे की, लक्ष्मी चंचल असती, तर तिने श्रीविष्णूचे चरण केव्हाच सोडून दिले असते.

## श्री लक्ष्मीकुबेर पूजाविधी

आश्विन अमावास्येच्या, म्हणजेच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व मंदिरांत, दुकानांत, तसेच घराघरांत श्री लक्ष्मीपूजन केले जाते. या पूजनाची सोप्या भाषेत शास्त्रोक्त माहिती येथे दिली आहे.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

## प्रत्यक्ष कृती

पूजकाने (यजमानाने) स्वतःला कुंकुम-तिलक लावून घ्यावा.आचमन

पुढील ३ नावे उच्चारल्यावर प्रत्येक नावाच्या शेवटी डाव्या हाताने पळीने पाणी उजव्या हातावर घेऊन प्यावे .

श्री केशवाय नमः । श्री नारायणाय नमः । श्री माधवाय नमः ।

या नावाने हातावर पाणी घेऊन खाली ताम्हणात सोडावे –

श्री गोविन्दाय नमः ।

त्यानंतर पुढील नावे अनुक्रमे उच्चारावी.श्री विष्णवे नमः । श्री मधुसूदनाय नमः । श्री त्रिविक्रमाय नमः । श्री वामनाय नमः । श्री श्रीधराय नमः । श्री हृषीकेशाय नमः । श्री पद्मनाभाय नमः । श्री दामोदराय नमः । श्री संकर्षणाय नमः । श्री वासुदेवाय नमः । श्री प्रद्युम्नाय नमः । श्री अनिरुद्धाय नमः । श्री पुरुषोत्तमाय

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

नमः । श्री अधोक्षजाय नमः । श्री नारसिंहाय नमः । श्री अच्युताय नमः । श्री जनार्दनाय नमः । श्री उपेन्द्राय नमः । श्री हरये नमः । श्री श्रीकृष्णाय नमः ।

(याप्रमाणे पुन्हा एकदा आचमन करावे म्हणजे द्विराचमन होते. पूजेच्या आरंभी आणि पूजेच्या शेवटी द्विराचमन करावे लागते.)(हात जोडावेत.)प्रार्थनाश्रीमन्महागणाधिपतये नमः । इष्टदेवताभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः । ग्रामदेवताभ्यो नमः । स्थानदेवताभ्यो नमः । वास्तुदेवताभ्यो नमः । आदित्यादिनवग्रहदेवताभ्यो नमः । सर्वेभ्यो देवेभ्यो नमः । सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमो नमः । अविघ्नमस्तु ।पूजकाने आपल्या दोन्ही डोळ्यांना पाणी लावावे आणि पुढील देशकाल म्हणावा.श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणो द्वितीये परार्धे विष्णुपदे श्रीश्वेत-वाराहकल्पे वैवस्वत मन्वंतरे अष्टाविंशतितमे युगे युगचतुष्के कलियुगे कलि प्रथम चरणे जंबुद्वीपे भरतवर्षे भरतखंडे

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

दक्षिणापथे रामक्षेत्रे बौद्धावतारे दंडकारण्ये देशे गोदावर्याः दक्षिणतीरे शालिवाहन शके अस्मिन्वर्तमाने व्यावहारिके शोभकृत् नाम संवत्सरे, दक्षिणायने, शरदऋतौ, आश्विन मासे, कृष्ण पक्षे, अमायांतिथौ (१४.४५ नंतर), भानु वासरे, स्वाती दिवस नक्षत्रे, आयुष्मान (१६.२४ नंतर सौभाग्य) योगे, चतुष्पाद करणे, तुला स्थिते वर्तमाने श्रीचंद्रे, तुला स्थिते वर्तमाने श्रीसूर्ये, मेष स्थिते वर्तमाने श्रीदेवगुरौ, कुंभ स्थिते वर्तमाने श्रीशनैश्चरे, शेषेषु सर्वग्रहेषु यथायथं राशिस्थानानि स्थितेषु एवं ग्रहगुणविशेषण विशिष्टायां शुभपुण्यतिथौ

(महापुरुष भगवान श्रीविष्णूंच्या आज्ञेने प्रेरित झालेल्या या ब्रह्मदेवाच्या दुसऱ्या परार्धामधील विष्णुपदातील श्रीश्वेत-वराह कल्पामधील वैवस्वत मन्वंतरातील अठ्ठाविसाव्या युगातील चतुर्युगातील कलियुगाच्या पहिल्या चरणातील आर्यावर्त देशातील (जम्बुद्वीपावरील भरतवर्षामध्ये भरत खंडामध्ये दंडकारण्य देशामध्ये गोदावरी नदीच्या दक्षिण

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

तटावर बौद्ध अवतारात रामक्षेत्रात) सध्या चालू असलेल्या शालिवाहन शकातील व्यावहारिक शोभकृत् नावाच्या संवत्सरातील (वर्षातील) दक्षिणायनातील शरद ऋतूतील आश्विन मासातील (महिन्यातील) कृष्ण पक्षातील ज्यांना वरील देशकाल म्हणणे कठीण जात असेल त्यांनी पुढील श्लोक म्हणावा आणि नंतर संकल्प म्हणावा.

तिथिर्विष्णुस्तथा वारं नक्षत्रं विष्णुरेव च ।

योगश्च करणं चैव सर्वं विष्णुमयं जगत् ।।

## संकल्प

उजव्या हातात अक्षता घ्या आणि पुढील संकल्प म्हणा ईथे आपले नाव गोत्र ,नक्षत्र, घ्यावे मम आत्मनः परमेश्वर-आज्ञारूप-सकलशास्त्र-श्रुतिस्मृतिपुराणोक्त-फलप्राप्तिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थंश्रीमहालक्ष्मीप्रीतिद्वारा अलक्ष्मीपरिहारपूर्वकंविपुलश्रीप्राप्ति-सन्मंगल-महैश्वर्य-कुलाभ्युदय-सुखसमृद्ध्यादि-कल्पोक्त-फलसिद्ध्यर्थं लक्ष्मीपूजनं कुबेरपूजनं च करिष्ये । तत्रादौ

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

निर्विघ्नतासिद्ध्यर्थं महागणपतिपूजनं करिष्ये । शरीरशुद्ध्यर्थं विष्णुस्मरणं करिष्ये । कलशशंखघंटादीपपूजनं करिष्ये ।(श्री महालक्ष्मीच्या प्रितीने माझे / आमचे दारिद्र्य परिहार व्हावे व पुष्कळ लक्ष्मीप्राप्ति, मंगल ऐश्वर्य, कुलाची अभिवृद्धि, सुख-समृद्धि आदि फलप्राप्ति व्हावी; म्हणून लक्ष्मीपूजन आणि कुबेरपूजन करतो.)

## श्री गणपतिपूजन

(ताम्हणात किंवा पाटावर तांदुळ घेऊन त्यावर विडा आणि नारळ ठेवावा. नारळ ठेवताना नारळाची सोंड पूजकाच्या दिशेने ठेवावी. विडा ठेवताना देठ देवाच्या बाजूला आणि अग्रभाग पूजकाच्या दिशेने ठेवावेत. पुढील मंत्र म्हणून नारळावर गणपतीचे आवाहन करावे व पूजा करावी.)

वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।।

ऋद्धिबुद्धिशक्तिसहितमहागणपतये नमो नमः ।(ऋद्धी, बुद्धी आणि शक्ती सहित महागणपतीला नमस्कार

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

करतो.)महागणपतिं साङ्गं सपरिवारं सायुधं सशक्तिकम् आवाहयामि ।महागणपतये नमः । ध्यायामि ।(महागणपतीचे ध्यान करतो.)महागणपतये नमः । आवाहयामि ।

(महागणपतीला नमस्कार करून आवाहन करतो.)(नारळावर अक्षता वहाव्यात.)महागणपतये नमः । आसनार्थे अक्षतान् समर्पयामि । (अक्षता वहाव्यात.)

महागणपतये नमः । चन्दनं समर्पयामि ।

(नारळाला गंध लावावे.)ऋद्धिसिद्धिभ्यां नमः । हरिद्राकुङ्कुमं समर्पयामि । (हळद, पिंजर वहावी.)

महागणपतये नमः । पूजार्थे कालोद्भवपुष्पाणि समर्पयामि ।(फुले वहावी.)

महागणपतये नमः । दूर्वाङ्कुरान् समर्पयामि ।महागणपतये नमः । धूपम् समर्पयामि (उदबत्ती ओवाळावी.)महागणपतये नमः । दीपं समर्पयामि । (निरांजन ओवाळावे.)महागणपतये नमः । नैवेद्यार्थे पुरतस्थापित-मधुरनैवेद्यं निवेदयामि ।

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

(उजव्या हातात दूर्वा किंवा फूल घेऊन त्याच्यावर पाणी घालावे. ते पाणी नैवेद्यावर शिंपडून आपल्या दोन्ही डोळ्यांवर डावा हात ठेवून पुढील मंत्र म्हणत नैवेद्य समर्पण करावा.)

प्राणाय स्वाहा’ ।(हे प्राणासाठी अर्पण करत आहे.)

अपानाय स्वाहा’ ।(हे अपानासाठी अर्पण करत आहे.)

व्यानाय स्वाहा ।(हे व्यानासाठी अर्पण करत आहे.)

उदानाय स्वाहा ।(हे उदानासाठी अर्पण करत आहे.)

समानाय स्वाहा ।(हे समानासाठी अर्पण करत आहे.)

ब्रह्मणे स्वाहा’ (ते फूल किंवा दूर्वा नारळावर वहाव्यात.)

महागणपतये नमः । नैवेद्यं समर्पयामि । अर्पण करतो.)

मध्ये पानीयं समर्पयामि ।उत्तरापोशनं समर्पयामि ।हस्तप्रक्षालनं समर्पयामि ।मुखप्रक्षालनं समर्पयामि ।करोद्वर्तनार्थे चन्दनं समर्पयामि ।मुखवासार्थे पूगीफलताम्बूलं समर्पयामि ।दक्षिणां समर्पयामि

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
7304904149

।(समर्पयामि म्हणतांना हातावर पाणी घेऊन ताम्हणात सोडावे.)

कार्यं मे सिद्धिमायातु प्रसन्ने त्वयि धातरि ।विघ्नानि नाशमायान्तु सर्वाणि गणनायक (ह्या पूजेने सर्व संकटांचा नाश करणारा महागणपती प्रसन्न होवो.)(उजव्या हातावर पाणी घेऊन ते ताम्हणात सोडावे.)

## श्रीविष्णुस्मरण

हात जोडावे आणि 'विष्णवे नमो असे म्हणावे.

कलशपूजाकलशदेवताभ्यो नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।(कलशामध्ये गंध, अक्षता व फूल एकत्रित वहावे.)

घंटापूजाघंटायै नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।(घंटेला गंधाक्षतफूल वहावे.)

दीपपूजादीपदेवताभ्यो नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।(समईला गंधाक्षतफूल वहावे.)

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थाङ्गतोऽपि वा ।यः स्मरेत्पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यन्तरः शुचिः ।।

(या मंत्राने तुळशीपत्र पाण्यात भिजवून पूजासाहित्यावर अणि आपल्या अंगावर पाणी प्रोक्षण करावे.)

श्री लक्ष्मीकुबेर पूजन आणि श्री लक्ष्मीकुबेराचे ध्यान करावे

ध्यायामि तां महालक्ष्मीं कर्पूरक्षोदपाण्डुराम् ।

शुभ्रवस्त्रपरीधानां मुक्ताभरणभूषिताम् ।।

पङ्कजासनसंस्थानां स्मेराननसरोरुहाम् ।

शारदेन्दुकलाकान्तिं स्निग्धनेत्रां चतुर्भुजाम् ।।

पद्मयुग्माभयवरव्यग्रचारुकराम्बुजाम् ।

अभितो गजयुग्मेन सिच्यमानां कराम्बुना ।।

कापूराच्या चूर्णाप्रमाणे शुभ्र वस्त्र नेसलेल्या, मुक्ताभरणांनी विभूषित, कमळामध्ये निवास करणाऱ्या, स्मित मुखारविंद असलेल्या, शरद ऋतूतील चंद्रकलेप्रमाणे सौंदर्य असणाऱ्या, पाणीदार डोळे असणाऱ्या, चतुर्भुज, जिने दोन करकमळामध्ये

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

कमळे आणि दोन हातांनी अभय अन् वरदमुद्रा धारण केल्या आहेत अशा, जिला दोन हत्ती आपल्या शुंडेतील पाण्याने सर्व बाजूंनी अभिषेक घालत आहेत अशा महालक्ष्मीचे मी ध्यान करतो. शास्त्रोक्त मंत्रपठण करणे प्रत्येकालाच शक्य नसते. त्यामुळे कोणत्याही पूजकाला सहज पठण करता येईल, अशी 'नाममंत्रयुक्त पूजा' पुढे देत आहोत. पूजकाने (पूजा करणाऱ्या व्यक्तीने) प्रत्येक नाममंत्राखाली मूळ शास्त्रोक्त मंत्र न देता त्यांचा केवळ अर्थ दिलेला आहे. अर्थ समजल्यामुळे त्याला भावपूर्ण पूजन करणे सुलभ होईल. 'आवाहयामि आणि 'समर्पयामि

## आवाहन

महालक्ष्मि समागच्छ पद्मनाभपदादिह ।

पूजामिमां गृहाण त्वं त्वदर्थं देवि संभृताम् ।।

(प्रत्येक वेळी अक्षता वहातांना मध्यमा, अनामिका आणि अंगुष्ठ (अंगठा) एकत्र करूनच वहाव्यात.)श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । आवाहयामि ।।(हात जोडावेत.)

## आसन

**श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः आसनार्थे अक्षतान् समर्पयामि ||**

**(श्री लक्ष्मीकुबेराच्या चरणी अक्षता वहाव्यात.)**

**(पूजेसाठी छायाचित्र असल्यास फुलाने अथवा तुळशीपत्राने पाणी प्रोक्षण करावे. मूर्ती अथवा प्रतिमा असल्यास आपल्यासमोर ताम्हणामध्ये ठेऊन पुढील उपचार समर्पित करावेत.) पाद्य श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः | पाद्यं समर्पयामि ||(उजव्या हाताने पळीभर पाणी श्री लक्ष्मीच्या चरणी घालावे.)**

## अर्घ्य

**श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः | अर्घ्यं समर्पयामि ||**

**(डाव्या हाताने पळीभर पाणी भरून घ्या. त्या पाण्यात गंध-फूल अक्षता घाला. उजव्या हाताने पळीतील पाणी श्री लक्ष्मीच्या चरणी वहा.)**

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

**आचमनश्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । आचमनीयं समर्पयामि ।।(उजव्या हाताने पळीभर पाणी श्री लक्ष्मीच्या चरणी घालावे.)**

**। स्नानं समर्पयामि ।।(उजव्या हाताने पळीभर पाणी श्री लक्ष्मीच्या चरणी घालावे.) श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । पंचामृतस्नानं समर्पयामि। तदन्ते शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।।**

**(दूध, दही, तूप, मध व साखर एकत्र केलेले देवीच्या चरणी वहावे. त्यानंतर पळीभर शुध्द पाणी घालावे.)**

**गंधाचे स्नान श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । गंधोदकस्नानं समर्पयामि ।।**

**(पळीभर पाणी घ्यावे. त्यात गंध घालून ते पाणी देवीच्या चरणी वहावे.)**

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

# महाभिषेक

ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्मी नमः:।।

अथ श्री इंद्रकृत श्री महालक्ष्मी अष्टक

श्री गणेशाय नमः

॥ श्री महालक्ष्म्यष्टकम् ॥

नमस्तेस्तू महामाये श्रीपिठे सूरपुजिते ।शंख चक्र गदा हस्ते महालक्ष्मी नमोस्तूते

नमस्ते गरूडारूढे कोलासूर भयंकरी ।सर्व पाप हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते

सर्वज्ञे सर्ववरदे सर्वदुष्ट भयंकरी ।सर्व दुःख हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

सिद्धीबुद्धीप्रदे देवी भुक्तिमुक्ति प्रदायिनी ।मंत्रमूर्ते सदा देवी महालक्ष्मी नमोस्तूते

आद्यंतरहिते देवी आद्यशक्ती महेश्वरी ।योगजे योगसंभूते महालक्ष्मी नमोस्तूते

स्थूल सूक्ष्म महारौद्रे महाशक्ती महोदरे ।महापाप हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते

पद्मासनस्थिते देवी परब्रम्हस्वरूपिणी ।परमेशि जगन्मातर्र महालक्ष्मी नमोस्तूते

श्वेतांबरधरे देवी नानालंकार भूषिते ।जगत्स्थिते जगन्मार्त महालक्ष्मी नमोस्तूते

महालक्ष्म्यष्टकस्तोत्रंय:पठेत्
भक्तिमान्नर:।सर्वसिद्धीमवाप्नोति राज्यं प्राप्नोति सर्वदा

एककाले पठेन्नित्यं महापापविनाशनं ।द्विकालं य: पठेन्नित्यं धनधान्य समन्वित: ॥१०॥

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

त्रिकालं यः पठेन्नित्यं महाशत्रूविनाशनं ।महालक्ष्मीर्भवेन्नित्यं प्रसन्ना वरदा शुभा ॥११॥॥इतिंद्रकृत श्रीमहालक्ष्म्यष्टकस्तवः संपूर्णः ॥

**ॐश्रींनमः ॐ कूबेर लक्ष्मै नमः ॐ लक्ष्मीनारायणाय नमः हे मंत्र 16 वेळा म्हणुन अभीषेक करावा**

त्यानंतर मूर्ती अथवा प्रतिमा आपल्यासमोर ताम्हणात घेतली असल्यास स्वच्छ धुवून पुसून परत मूळ स्थानी ठेवावी आणि **पुढील पूजा करावी.**

वस्त्र श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः | वस्त्रोपवस्त्रार्थे कार्पासनिर्मिते वस्त्रे समर्पयामि ||

(देवीला कापसाचे वस्त्र आणि उपवस्त्र वहावे.)अर्थ : तंतूच्या सातत्यामुळे तंतूमय असे आणि कलाकुसरीने युक्त, शरीराला अलंकृत करणारे असे हे श्रेष्ठ वस्त्र हे देवी तू परिधान कर.कंचुकीवस्त्रश्री लक्ष्म्यै नमः | कंचुकीवस्त्रं समर्पयामि ||(उपलब्धतेनुसार साडी, चोळी अर्पण करावी.)अर्थ : हे

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

विष्णुवल्लभे मोत्यांच्या मण्यांच्या समूहाने युक्त अशी सुखद आणि (अनमोल) अमोल अशी चोळी मी तुला देतो.गंधश्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ।।(गंध लावावे.) मलय पर्वतावर झालेले, अनेक नागांनी रक्षण केलेले अत्यंत शीतल आणि सुगंधित असे हे चंदन स्वीकार कर.हळदकुंकूश्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । हरिद्रां कुंकुमं समर्पयामि ।।

(हळदकुंकू वहावे.) हे ईश्वरी, मी आणले हे ताटंक, हळदीकुंकू, अंजन, सिंदूर आणि आळीता आदी सौभाग्यद्रव्य तुला देतो (याचा स्वीकार कर)श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । अंलकारार्थे नानाभरणभूषणानि समर्पयामि ।।

(उपलब्धतेनुसार सौभाग्यालंकार अर्पण करावे.)हे देवी, रत्नजडीत कंकणे, बाहूबंध, कटिबंध, कर्णभूषणे, पैंजण, मोत्यांचा हार, मुकुट आदी अलंकार तू धारण कर.पुष्पश्री

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । पूजार्थे ऋतुकालोद्भवपुष्पाणि तुलसीपत्राणि दुर्वांकुरांश्च समर्पयामि ।।

(फुले, तुळशी, बेल, दूर्वा तसेच उपलब्धतेनुसार पत्री अर्पण करावी.)हे लक्ष्मी, प्राप्त झालेल्या सुगंधामुळे आनंदित आणि मत्त अशा भ्रमरांच्या समूहामुळे व्यापलेला नंदनवनातील फुलांचा संचय तू घे.

धूप श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । धूपं समर्पयामि ।।(उदबत्ती ओवाळावी.)

दीप श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । दीपं समर्पयामि ।।(नीरांजन ओवाळावे.)

(उजव्या हातात तुळशीपत्र / बेलाचे पान / दूर्वा घेऊन त्याच्यावर पाणी घालावे. ते पाणी नैवेद्यावर शिंपडून तुळशीचे पान हातातच धरून ठेवावे आणि आपल्या दोन्ही डोळ्यांवर डावा हात ठेवून नैवेद्य दाखवत पुढील मंत्र म्हणत नैवैद्य

**समर्पण करावा.)(लवंग, वेलची, साखर घातलेले दूध तसेच लाडू यांचा नैवेद्य दाखवावा.)नैवेद्य**

**श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । नैवेद्यार्थे एला-लवंग-शर्करादि-मिश्रगोक्षीरलड्डुकादि-नैवेद्यं निवेदयामि ।।**

**प्राणाय स्वाहा । अपानाय स्वाहा । व्यानाय स्वाहा ।**

**उदानाय स्वाहा । समानाय स्वाहा। ब्रह्मणे स्वाहा ।।**

**(हातातील तुळशी देवीच्या चरणी वहाव्या. नंतर उजव्या हातावर पाणी घेऊन पुढील प्रत्येक मंत्र म्हणून ते पाणी ताम्हणात सोडावे.)**

**श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । नैवेद्यं समर्पयामि ।।मध्ये पानीयं समर्पयामि । उत्तरापोशनं समर्पयामि ।**

**हस्तप्रक्षालनं समर्पयामि । मुखप्रक्षालनं समर्पयामि ।**

**करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि ।।**

**श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः।मुखवासार्थे पूगीफलतांबूलं समर्पयामि ।।**

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

(पळीने उजव्या हातावर पाणी घेऊन ते विडा, सुपारी यांवर सोडावे.)

आरतीश्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । महानीरांजनदीपं समर्पयामि ।।(देवीची आरती म्हणावी.)

कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेन्द्रहारम् ।

सदा वसन्तं हृदयारविन्दे भवं भवानीसहितं नमामि ।।

(कापूर (कर्पूर) दाखवावा.)

इंद्रादि देवतांच्या शक्ती असणाऱ्या, त्याचप्रमाणे महादेव, महाविष्णू, ब्रह्मदेवाची शक्ती असणाऱ्या, मंगलरूप असणाऱ्या, सुख करणाऱ्या अशा हे मूळ प्रकृतिरूप असणाऱ्या

देवी तुला आम्ही सर्व नम्र होऊन सतत नमस्कार करतो.प्रदक्षिणाश्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । प्रदक्षिणान् समर्पयामि ।।(स्वतःभोवती तीन प्रदक्षिणा घालाव्यात.)

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्‌गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

मी जी जी काही पातके या जन्मात अथवा अन्य जन्मांत केली असतील, ती ती सर्व पातके प्रदक्षिणेच्या प्रत्येक पावलोपावलींनष्ट होतात. तूच माझा आश्रय आहेस तुझ्याशिवाय माझा रक्षणकर्ता दुसरा कुणीही नाही; म्हणून हे जगदंबे! करुणभावाने तू माझे रक्षण कर.

## मंत्रपुष्पाजंली

श्री लक्ष्मीकुबेराभ्यां नमः । मंत्रपुष्पांजलिं समर्पयामि ।।(गंध, फूल व अक्षता घेऊन 'समर्पयामि' म्हणतांना दोन्ही हातांच्या ओंजळीने देवीच्या चरणी वहाव्यात.) हे लक्ष्मी, विष्णूच्या धर्मपत्नी तू ही पुष्पांजली घे आणि या पूजेचे यथायोग्य फल मला प्राप्त करून दे.प्रार्थना

**या देवी सर्वभूतेषु लक्ष्मीरूपेण संस्थिता ।**

**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।।**

(हात जोडून देवीची आणि कुबेराची प्रार्थना करावी.)

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्‌गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

हे विष्णप्रिये तू वर देणारी आहेस, तुला मी नमस्कार करतो, तुला शरण आलेल्यांना जी गति प्राप्त होते, ती गति तुझी पूजा केल्याने मला प्राप्त होवो. जी देवी लक्ष्मी (तेजाच्या सौंदर्याच्या) रूपाने सर्व भूतांत निवास करते. तिला मी त्रिवार (तीन वेळा) नमस्कार करतो. संपत्तीच्या राशींचा अधिपति असणाऱ्या हे

कुबेरा तुला मी नमस्कार करितो. तुझ्या प्रसन्नतेने मला धनधान्य संपत्ती प्राप्त होवो.)

अनेन कृतपूजनेन श्री लक्ष्मीकुबेरौ प्रीयेताम् ।

(असे म्हणून हातात अक्षता घेऊन अन् त्यावर पाणी घालून ताम्हणात सोडावे आणि दोनदा आचमन करावे. )

कुबेराचा ध्यानमंत्र पुढीलप्रमाणे आहे.( 16 वेळा जप करणे .)

ॐ धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपाय च ।

भवंतु त्वत्प्रसादान्मे धनधान्यादिसंपदः ।।

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

# लक्ष्मी मंत्र

१) ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्मी नम:

२)ॐ श्रीं क्लीं महालक्ष्मी, महालक्ष्मी एह्येहि सर्व सौभाग्यं देहि मे स्वाहा

३)ॐ ह्रीं श्रीं क्रीं क्लीं श्री लक्ष्मी मम गृहे धन पुरये, धन पुरये, चिंता एं दुरयै स्वाहा दुरयै स्वाहा:

४)ॐ श्रीं -हीं क्लीं श्रीं सिद्ध लक्ष्मी

५)ॐ श्रीं ह्रीः क्लीं एं कमलवासिनयै स्वाहा

६)लक्ष्मी कुबेर मंत्र - ॐ ह्रीं श्रीं क्रीं श्रीं कुबेराय अष्ट लक्ष्मी मम गृहे धनम् पुरय पुरय नमः

७)ॐ ह्रीं श्रीं क्लीं श्रीं क्लीं वित्तेश्वराय नमः

८)ॐ श्रीं ह्रीं क्लीं त्रिभूवन महालक्ष्म्यै अस्मांक दारिद्रय नाशय प्रचूर धन देही देही क्लीं ह्रीं श्रीं ॐ

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

९)ॐ यक्षाय कुबेराय वै श्रवणाय धन धान्यादी पतये धनधान्य समृद्धी में देही दापय स्वाहा:

१०)ॐ ह्रीं श्रीं क्रीं श्रीं कुबेरायअष्टलक्ष्मी मम गृहे धनं पुरय पुरय नमः

११)ॐ श्रीं ह्रीं क्लीं श्रीं क्लीं वित्तेश्वराय नमः

१२)ॐ ह्रीं श्रीं लक्ष्मीभ्यो नमः

१३)ॐ ह्रीं पद्मे स्वाहा!

१४)ॐ मं मणीकर्णीके प्रणवात्मिके नम:

१५)ॐ श्रीं ॐ ह्रीं श्रीं ॐ ह्रीं श्रीं क्लीं वित्तेश्वराय नमः

१६)ॐ श्रीं नमः

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION

श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076

CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D

shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149


# बँक डीटेल्स

## G-PAY

Shree sadguru Foundation

UPI ID: shreesadgurukrupa.foundation@okaxis

Scan to pay with any UPI app

IDFC FIRST Bank

SCAN & PAY

UPI ID: shreesadguru1@idfcbank

| | |
|---|---|
| **Name** | SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION |
| **Account Number** | 10227556284 |
| **IFSC** | IDFB0040156 |
| **SWIFT Code** | IDFBINBBMUM |
| **Bank Name** | IDFC FIRST |
| **Branch** | POWAI BRANCH |